# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर
## पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव , जि.अहमदनगर

जा.क्र./ ऊस विकास / 592

दि. 15 JUN 2020

## -- परिपत्रक --

### -- ताग / धैंचा बियाणेंचा २५% अनुदानावर पुरवठा --

कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद व 'क' वर्ग ऊस उत्पादक सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, एकाच क्षेत्रात वारंवार ऊस पिक घेतल्याने तसेच पाण्याच्या व रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपिकता कमी झालेली आहे. त्यामुळे ऊसाची उत्पादकता घटत आहे.

जमिनीची सुपिकता सुधारण्यासाठी ऊस पिकाचे लागवडीपुर्वी त्या क्षेत्रात ताग किंवा धैंचा सारखी हिरवळीचे खत पिकाची पेरणी करुन जमिनीत गाडावीत त्यामुळे जमिनीचे भौतिक रासायनिक व जैविक गुणधर्म सुधारतात. सेंद्रीय पदार्थांची उपलब्धता वाढते. क्षारांचे प्रमाण कमी होऊन जमिनीचा पोत सुधारतो, जमिनीत नत्राची उपलब्धता वाढते. जमीन रवाळ होण्यास मदत होते व जमिनीचा कसदारपणा वाढतो. या कारणाने चालू खरीप हंगाम २०२० मध्ये ताग व धैंचा बियाणे खालील धोरणाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय मा.संचालक मंडळाने घेतलेला आहे.

१. लागवड हंगाम २०२०-२१ मध्ये होणा-या ऊस लागवडीकरीता २५ % अनुदानावर एकरी ४० किलो ताग किंवा एकरी २० किलो धैंचा बियाणे हिरवळीच्या खता करीता रोखीने, बियाणे उपलब्ध असेपर्यंत देण्यात येईल.

२. ताग व धैंचा बियाणांची मागणी बियाणे विक्री करतेवेळी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयात छापील फॉर्ममध्ये नोंदवावी.

३. बियाणांची मागणी नोंदवितांना कारखान्याकडे केलेली गळीत हंगाम २०२०-२१ ची ऊस नोंद विचारात घेतली जाईल.

४. ताग व धैंचा बियाणाच्या एकुण बिलाच्या रक्कमेपैकी ५०%रक्कम ऊस उत्पादकाकडुन बिल करतेवेळी रोख भरणा घेण्यात येईल.कारखान्यामार्फत २५% अनुदान देण्यात येईल व २५% रक्कम गळीतास येणाऱ्या ऊस बिलातुन अथवा एकत्रित कुटुंबातील देय पेमेटमधुन नावे टाकुन १२.५%व्याजदराने वसुल करण्यात येईल

५. ताग / धैंच्याचे पिक जमिनीत गाडलेनंतर त्या शेतात ऊसाची लागवड करावी. सदरच्या क्षेत्रात ऊस लागवड न केल्यास अथवा बियाणांची अन्य विल्हेवाट लावल्यास अथवा ऊस गळीतास न आल्यास दिलेल्या अनुदानाची संपूर्ण रक्कम सव्याज वसूल केली जाईल.

६. हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या जमिनीत ताग घ्यावा व क्षारयुक्त आणि भारी जमिनीत धैंचा हे पिक घ्यावे.

तरी सर्व ऊस उत्पादकांनी वरील योजनेचा लाभ घेऊन जमिनीची सुपीकता वाढवून ऊस उत्पादन वाढविण्याचे करावे.

आपला विश्वासु

गि.ज.जगताप

कार्यकारी संचालक